# YASHWANTRAO CHA VAN LAW COLLEGE, PUNE

ID No. PU/PN/LA W/038/1978, Affiliated to Savitribai Phule Pune University, Recognized by BCI and Accredited by NAAC, Bengaluru

website-www.yclawcollegepune.org, Email-yclawpune@gmail.com, Phone-020-24221002


---

# NOTICE

All the students are informed that as per the Circular no 289/2021 of SPPU, the college shall be holding classes offline and online from 20 October 2021. The students coming to college are required to abide by the rules of the Covid 19 pandemic as per the circulars of the UGC, the State Government and the Pune Municipal Corporation issued from time to time and attached with this Notice. The classes will be conducted in accordance with the timetables of all classes.

Principal

Date-18/10/2021

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. २८९/२०२१**

**विषय : राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरू करण्याबाबत.**

शासनाने, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि–३ दि. १३ ऑक्टोबर, २०२१ अन्वये राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग दि. २० ऑक्टोबर, २०२१ पासून सुरू करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. सोबत शासन निर्णयाची प्रत माहितीसाठी जोडली आहे.

राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड–१९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियत्रंण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड–१९ उपाययोजना नियम २०२० अमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड–१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड–१९ च्या प्रसारास पुणे व पिपंरी–चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत मा. आयुक्त, पुणे व पिपंरी–चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे.

या परिपत्रकाव्दारे सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था यांना कळविण्यात येते की, शासनाने तसेच मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका व मा. आयुक्त, पुणे व पिपंरी–चिंचवड महानगरपालिका यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करून काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच नाशिक व अहमदनगर जिल्हयातील सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था यांनी जिल्हा प्रशासन/स्थानिक प्राधिकरण यांनी निर्गमित केलेल्या आदेशानुसार महाविद्यालय सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच चालू सत्राचा अभ्यासक्रम विहित कालावधीमध्ये शिकवून पूर्ण करण्याची जबाबदारी प्राध्यापक/प्राचार्य यांची राहिल.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/३८३६ )
दिनांक : १८/१०/२०२१ )

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :–**

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
मा. संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

**प्रत माहितीसाठी :–**

मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे
मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे
मा. आयुक्त, पुणे व पिपंरी–चिंचवड महानगरपालिका
मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
मा. सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि-३**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १३ ऑक्टोबर, २०२१

**प्रस्तावनाः-**

राज्यातील ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १२ वी व शहरी भागात इयत्ता ८ वी ते १२ वी चे वर्ग दि. ०४ ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यात आले आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थी हे १८ वर्षांवरील असून बहुतेक विद्यार्थ्यांचे लसीकरण झाले असण्याची शक्यता आहे. तसेच, राज्यातील कोव्हिड-१९ बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झालेली असून सद्यस्थितीत ही साथ नियंत्रणाखाली आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये कोव्हिड प्रतिबंधात्मक सर्वसाधारण उपाययोजना करुन विद्यार्थ्यांकरिता ऑफलाईन पध्दतीने नियमित वर्ग सुरु करणे विद्यार्थ्यांच्या हिताचे राहील. सबब, राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रकः-**

१. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, विद्यापीठ/महाविद्यालयांचे वर्ग ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेने सुरु करण्याबाबत स्थानिक प्राधिकरणांशी विचारविनिमय करुन विद्यापीठांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

२. १८ वर्षावरील विद्यार्थी ज्यांनी कोव्हिड-१९ च्या लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत, तेच विद्यार्थी/विद्यार्थीनी विद्यापीठ व महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहू शकतील.

३. प्रतिबंधित प्रक्षेत्रात येणारी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये ही ज्या आयुक्त, महानगरपालिका/ नगरपालिका किंवा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे अंतर्गत येतात, त्यांच्याशी कोव्हिड-१९ च्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित प्रक्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेऊन, विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करण्याबाबत विचारविनिमय करुन योग्य तो निर्णय संबंधित

विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर घ्यावा व त्यानुसार महाविद्यालयांना सविस्तर मार्गदर्शक सूचना/ मानक कार्य प्रणाली (एसओपी) देण्यात यावी.

४. राज्यातील सुरु होणाऱ्या सर्व विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांनी कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

५. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, त्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

६. वसतीगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

७. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींनी कोव्हिड-१९ ची लस घेतलेली नाही, त्यांच्याकरिता विद्यापीठाने संबंधित संस्थांचे प्रमुख/ महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे मदतीने स्थानिक जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून लसीकरणासाठी विशेष मोहिम राबवून लसीकरण प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे. तसेच विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे देखील लसीकरण प्राधान्याने करुन घ्यावे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२११०१३१६४६०१५५०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**( प्रविणकुमार पवार )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत-**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

७. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

८. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

९. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१०. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे

११. कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे

१२. कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे

१३. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड

१४. कुलगुरु, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर

१५. कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

१६. सर्व महानगरपालिका आयुक्त

१७. सर्व जिल्हाधिकारी

१८. प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१९. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे

२०. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई

२१. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई

२२. निवडनस्ती (विशि-३).

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id: mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/माप्रवि/ ६०४८
दिनांक :०८/१०/२०२१

## आदेश

**विषय:-** कोरोना विषाणू (कोविड - १९ ) संसर्ग साखळी तोडण्यासाठी " Break the Chain " सुधारित मार्गदर्शक सूचना

**संदर्भ:-**
१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
४) महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दि.१७.०४.२०२०,२१.०४.२०२०,२९.०६.२०२०,०६.०७.२०२०,३१.०७.२०२० ३१.०८.२०२०,३०.०९.२०२०,१४.१०.२०२०,२३.१०.२०२०,३.११.२०२०, १४.११.२०२०,२३.११.२०२०,२७.११.२०२०,२१.१२.२०२०,२९.१२.२०२०, १४.०१.२०२१,१०.०२.२०२१,१५.०३.२०२१,१७.०३.२०२१,२७.०३.२०२१. ४.०४.२०२१,१३.०४.२०२१,२०.०४.२०२१,२१.०४.२०२१,२९.०४.२०२१, १२.०५.२०२१,३०.०५.२०२१,०४.०६.२०२१,१०.०६.२०२१,२५.०६.२०२१
५) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, आदेश क्रमांक : कोरोना-२०२१/प्र.क्र.३६६/आ-५, दि.०२.०८.२०२१,दि.११.०८.२०२१,दि.२४.०९.२०२१
६) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, आदेश क्रमांक : कोरोना-२०२१/प्र.क्र.४२१/आ-५, दि.०६.१०.२०२१
७) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०,२९३४,दि.०३.०८.२०२०,३७९१,दि.०२.०९.२०२०,४६१५, दि.०१.१०.२०२०,४८२३,दि.०९.१०.२०२०,४८७४,दि.१३.१०.२०२०,५१३५, दि.२१.१०.२०२०,५१९६,दि.२४.१०.२०२०,५३४२,दि.२९.१०.२०२०,५३४५, दि.३१.१०.२०२०,५४६७,दि.०५.११.२०२०,५६४३,दि.१९.११.२०२०,५९४७, दि.०१.१२.२०२०,६६०८,दि.२२.१२.२०२०,६८३८,दि.३१.१२.२०२०,७१३९, दि.११.०१.२०२१,७३५५,दि.१६.०१.२०२१,७४५८,दि.२०.०१.२०२१,७५४७, दि.२२.०१.२०२१,७५७४,दि.२२.०१.२०२१,७७८५,दि.०१.०२.२०२१,८०२१, दि.०९.०२.२०२१,८२७४,दि.१८.०२.२०२१,८३०८,दि.२१.०२.२०२१,८५७७, दि.२८.०२.२०२१,९०५२,दि.१२.०३.२०२१,९१४४,दि.१६.०३.२०२१,९३१, दि.२०.०३.२०२१,९५३१,दि.२६.०३.२०२१,९५४५,दि.२७.०३.२०२१,५८, दि.०२.०४.२०२१,८९,दि.०५.०४.२०२१,११३,दि.०६.०४.२०२१,२४०, दि.०९.०४.२०२१, ३००,दि. १४.०४.२०२१,४०७,दि.१७.०४.२०२१,४८९, दि. २०.०४.२०२१,५२३,दि २२.०४.२०२१,८३९,दि.३०.०४.२०२१,१२८०, दि.१४.०५.२०२१,१२८२,दि.१४.०५.२०२१,१७६५,दि.२८.०५.२०२१,१८१८, दि.३१.०५.२०२१,१९९०,दि.०५.०६.२०२१,२१८५,दि.११.०६.२०२१,२३९३ दि.१८.०६.२०२१,२७१३,दि.२६.०६.२०२१,२९७३,दि.०२.०७.२०२१,३३११ दि.१५.०७.२०२१,३८०१,दि.३१.०७.२०२१,४०२५, दि.०८.०८.२०२१,४२७६ दि.१४.०८.२०२१, ५३४३ दि. १७.०९.२०२१, ५३४५ दि.१७.०९.२०२१, ५५८५, दि.२५.०९.२०२१,५८७१ दि.०२.१०.२०२१,५९२५ दि.०४.१०.२०२१,५९४८, दि.०५.१०.२०२१

ज्याअर्थी, उपरोक्त सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भ क्र.५ व ६ मधील

आदेशान्वये राज्यात कोविड – १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी राज्यातील कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंध करण्याकरिता प्रसारणाची साखळी प्रभावीपणे खंडित करण्यासाठी लावलेले निर्बंध जिल्हानिहाय / प्रशासकीय युनिटनिहाय शिथिल करणे तसेच विविध आर्थिक आणि सामाजिक उपक्रम नियोजनबद्ध सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने सुधारित आदेश निर्गमित केलेले आहेत.

ज्याअर्थी सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका** क्षेत्रामध्ये कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या महाविद्यालयांचे नियमित वर्ग कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक ११.१०.२०२१ पासून सुरु करणेस परवानगी देण्यात येत आहे. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारीवर्ग यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले असणे अनिवार्य राहील. महाविद्यालयांमध्ये मास्कचा वापर, सोशल डिस्टंसिंग, सॅनिटायझेशन या बाबतच्या नियमांचे ( Covid Appropriate Behavior ) पालन करणे बंधनकारक राहील.

२) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रशिक्षण संस्था हॉलच्या आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. मात्र सदर ठिकाणी कार्यरत असणारे प्रशिक्षक व कर्मचारी यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले असणे अनिवार्य राहील.

३) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील कोचिंग क्लासेस ( Coaching Classes ) हॉलच्या आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. मात्र सदर ठिकाणी कार्यरत असणारे प्रशिक्षक व कर्मचारी यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले असणे अनिवार्य राहील.

४) रेस्टॉरंट, बार, फुड कोर्ट हे आठवड्यातील सर्व दिवस रात्री ११.०० वाजेपर्यंत आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. पार्सल सेवा / घरपोच सेवा ( Home Delivery ) रात्री १२.०० पर्यंत सुरु राहील.

५) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय तसेच खाजगी कार्यालये येथील उपस्थिती १००% क्षमतेने अनुज्ञेय करण्यात येत आहे. मात्र सदर ठिकाणी कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचारी यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले असणे अनिवार्य राहील.

६) उपरोक्त आस्थापनांनी मास्कचा वापर, सोशल डिस्टंसिंग, सॅनिटायझेशन या बाबतच्या नियमांचे ( Covid Appropriate Behavior ) तसेच मे.शासनाने व इकडील कोविड-१९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

७) सदर आदेश हे पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये येणाऱ्या पुणे कटक मंडळ व खडकी कटक मंडळ यांना देखील लागू राहतील.

८) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि.०८.१०.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि.०८.१०.२०२१ रोजी दिलेला आहे.

स्वाक्षरी /xxx
( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

निर्गमित

Raut
( रविंद्र बिनवडे )
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
8/10/2021

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११ ०१८
फोन नं. ०२० - ६७३३३३३३
फॅक्स नं. ०२० - २७४२५६००
वेबसाईट :- www.pcmcindia.gov.in

क्र.वैद्य/०९/कावि/४६७१/२०२१ दि. ०९.१०.२०२१

**विषय : कोरोना विषाणू ( कोविड १९ ) संसर्ग साखळी तोडण्यासाठी "Break The Chain" प्रतिबंधात्मक आदेश.**

संदर्भ : १) शासन परिपत्रक क्रमांक - समय २०२०/प्र.क्र. ३५/ १८ (रा.व.फ.) दिनांक०७.०४.२०२०

२) मा. विभागीय आयुक्त (पुणे) कार्या क्रमसाप्र.१./आर आर/१०२४/२०२० यांचे दिनांक : २८.०८.२०२० रोजीचे पत्र.

३) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल मंत्रालय, मुंबई. क्रमांक कोरोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य - ५, दिनांक १४ मार्च २०२०

४) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५

५) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७

६) महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.महसूल व वन विभाग (DMU/2020/CR.92/DISM.1) दि. १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल, २९जुन २०२०, ६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २९ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर २०२०, १४ नोव्हेंबर २०२०, २३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०, २४ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर २०२०, १४ जानेवारी २०२१, १० फेब्रुवारी २०२१, २५ मार्च २०२१, २७ मार्च २०२१, ०४ एप्रिल २०२१, १३ एप्रिल २०२१, २० एप्रिल २०२१, २१ एप्रिल २०२१, २९ एप्रिल २०२१, १२ मे २०२१ ३० मे २०२१, ०४ जुन २०२१, २५ जुन २०२१

७) मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे आदेश जा. क्र. वैद्य/०५/कावि/१२९६/२०२१ दि. १४.०४.२०२१, क्र. १३१७, दि. १७.०४.२०२१,क्र. १३२१, दि. २०.०४.२०२१, क्र. १३६९दि. २२.०४.२०२१,क्र. १५५८ दि. ३०.०४.२०२१, क्र. १६११ दि. १३.०५.२०२१, क्र. १६८६ दि. १९.०५.२०२१,क्र. २०४४ दि. २९.०५.२०२१, क्र. २०४६ दि. ३१.०५.२०२१, क्र. २४०३ दि. ०५.०६.२०२१, क्र. २५१२ दि. ११.०६.२०२१, क्र. २६२६ दि. १९.०६.२०२१, क्र. २६६५दि.२६.०६.२०२१,क्र. २७८८ दि. ०३.०७.२०२१, क्र. २९२३ दि. ११.०७.२०२१, क्र. ३०२६ दि. १७.०७.२०२१, क्र. ४०४० दि. ०१.०८.२०२१, क्र. ४१६० दि. ०८.०८.२०२१ क्र. ४२२९ दि. १४.०८.२०२१, क्र. ४५११ दि. ०९.०९.२०२१, क्र. ४६१४ दि. १७.०९.२०२१ क्र. ४६२० दि. २२.०९.२०२१, क्र. ४७३५ दि. २७.०९.२०२१, क्र. ४८२६ दि. ०५.१०.२०२१ क्र. ४८४४ दि. ०५.१०.२०२१

८) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन,आदेश क्रमांक : कोरोना-२०२१/प्र.क्र.३६६/आ-५, दि. ०२.०८.२०२१, ११.०८.२०२१, १६.०८.२०२१,२४.०९.२०२१

९) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन,आदेश क्रमांक : कोरोना-२०२१/प्र.क्र.४२१/आ-५, दि. ०६.१०.२०२१

**आदेश.**

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ०८ व ०९ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोविड - १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी, राज्यातील कोविड - १९ च्या प्रसारास प्रतिबंध करण्याकरिता प्रसारणाची साखळी प्रभावीपणे खंडित करण्यासाठी लावलेले निर्बंध जिल्हानिहाय / प्रशासकीय युनिटनिहाय शिथिल करणे तसेच विविध आर्थिक आणि सामाजिक उपक्रम नियोजनबद्ध सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने सुधारित आदेश निर्गमित केलेले आहेत.

ज्याअर्थी, सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड - १९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड - १९ उपाययोजना नियम २०२० अमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड - १९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड - १९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी, राजेश पाटील, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,** पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रामध्ये कोविड - १९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या महाविद्यालयांचे नियमित वर्ग कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक १२.१०.२०२१ पासून सुरु करणेस परवानगी देण्यात येत आहे. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्ग यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले असणे अनिवार्य राहील. महाविद्यालयांमध्ये मास्कचा वापर, सोशल डिस्टन्सिंग, सॅनिटायझेशन याबाबतच्या नियमांचे (Covid Appropriate Behaviour) पालन करणे बंधनकारक राहील.

२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रशिक्षण संस्था हॉलच्या आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. मात्र सदर ठिकाणी कार्यरत असणारे प्रशिक्षक व कर्मचारी यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले असणे अनिवार्य राहील.

३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कोचिंग क्लासेस (Coaching Classes) हॉलच्या आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. मात्र सदर ठिकाणी कार्यरत असणारे प्रशिक्षक व कर्मचारी यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले असणे अनिवार्य राहील.

४) रेस्टॉरंट, बार, फुड कोर्ट हे आठवड्यातील सर्व दिवस रात्री ११.०० वाजेपर्यंत आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. पार्सल सेवा / घरपोच सेवा (Home Delivery) रात्री १२.०० पर्यंत सुरु राहील.

५) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय तसेच खाजगी कार्यालये येथील उपस्थिती १००% क्षमतेने अनुज्ञेय करण्यात येत आहे. मात्र सदर ठिकाणी कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचारी यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले असणे अनिवार्य राहील.

६) उपरोक्त आस्थापनांनी मास्कचा वापर, सोशल डिस्टन्सिंग, सॅनिटायझेशन याबाबतच्या नियमांचे (Covid Appropriate Behaviour) तसेच मा. शासनाने व इकडील कोविड १९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

७) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड - १९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि. १२.१०.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. ०९.१०.२०२१ रोजी दिलेला आहे.

०९/१०/२१

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे ४११ ०१८.

**प्रत माहितीस्तव सादर -**

१) मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,पुणे.
२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
३) मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय, चिंचवड.
४) सर्व क्षेत्रिय अधिकारी व संबंधित विभाग प्रमुख, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित